**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

अर्थसंकल्पात तरतूद झाली नाही,

# वन पर्यटनासाठी मिळणार मोठी संधी

## विक्रमसिंह पाटणकर ; पाटण महोत्सवाचे उद्‌घाटन



**पाटण :** महोत्सवाचे उद्‌घाटन करताना विक्रमसिंह पाटणकर व मान्यवर. **(जालिंदर सत्रे :** सकाळ छायाचित्रसेवा)

**पाटण, ता. २८ :** शासकीय नोकरीच्या संधी कमी होत चालल्यात. रोजगार उपलब्ध करून स्वतः मालक होणे काळाची गरज आहे. व्यवसाय हे उभे राहतात ते स्वयं निरीक्षणातून. आम्ही ग्रामीण भागातील असे रडत बसणे, कोणी तरी येईल आणि नोकरी देईल या दिवास्वप्नाच्या ऐवजी कोणीही आले तरी मी त्याला रोजगार देईन अशी भूमिका तरुणांनी घेऊन रोजगार निर्मितीसाठी कायम प्रयत्नशील राहावे. पाटण तालुक्यात वन पर्यटनामध्ये मोठी संधी आहे. स्थानिक युवकांनी याचाही फायदा करून घ्यावा, असे आवाहन माजी सार्वजनिक बांधकाममंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी प्रतिपादन केले.

पाटण महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. या वेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव मस्के, कोयना एज्युकेशन सोसायटीचे सचिव अमरसिंह पाटणकर, सहसचिव डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, नगराध्यक्षा अनिता देवकांत, दादासाहेब जाधव, शरद देशमुख, पृथ्वीराज पाटील, कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे, डॉ. हेमलता काटे आणि पाटण महोत्सव समिती सदस्य उपस्थित होते.

श्री. पाटणकर पुढे म्हणाले, की छोटे-छोटे उद्योगातून मोठा उद्योग निर्माण होत असतो. सुरुवातीला लहान उद्योगापासून सुरुवात करावी. स्वयंनिरीक्षण, अनुभव यातून आपला नवीन उधोग उभा करावा. उद्योग वाढवून आपल्यासोबत समाजाची प्रगती करावी. उद्योगाच्या माध्यमातून रोजगार कसा निर्माण होईल, याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे. या पाटण महोत्सवातील सर्व स्टॉलला भेट देऊन नवीन तंत्रज्ञान, शेती, गृहउद्योग, लघुउद्योग यातून आपल्याला साजेसा असा उद्योग उभा करावा आणि त्यातून परिसरातील अनेकांना रोजगार निर्माण कसा होईल याकडे कटाक्षाने पाहावे. या पाटण महोत्सवाच्या माध्यमातून संधीचे आपण सोने करून नवीन उद्योग उभा युवकांना रोजगार निर्माण कराल, या तीन दिवसांच्या पाटण महोत्सवामध्ये आपल्या परिसरातील सर्व विद्यार्थी, शेतकरी, महिला यांना आवर्जून भेट देण्यासाठी सांगा, या आलेल्या संधीचा फायदा आपण घ्यावा, असे आवाहन देखील त्यांनी केले. या वेळी विद्यार्थी तालुक्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी, परिसरातील शेतकरी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.